## महाराष्ट्र शासन

# ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

## नगर भवन, मुंबई ४०० ००१

## "ग्रंथ निवड समिती बैठक संपन्न - मुंबई

ग्रंथ निवड समितीची पुनर्रचना उच्च व तंत्र शिक्षण व विभागाचा शासन निर्णय क्रमांक मराग्रं-२०२०/प्र.क्र.५१/२०२०/ई-९४९५४८/ग्रं.क.,दिनांक १६ जून २०२५ अन्वये झाली. सदर समितिची पहिली बैठक अध्यक्ष, श्री. अभिराम भडकमकर आणि सर्व समिती सदस्य श्री. दादा गोरे, डॉ. उज्ज्वला मेहेंदळे, प्रा. विवेक अलोणी, डॉ.आशुतोष देशपांडे, श्रीमती. ज्योत्स्ना कोल्हटकर, श्री. रवींद्र पांडे, श्री.चांगदेव भीमराज काळे, श्री. गुलाबराव अप्पाराव मगर, श्री. सतीश दशरथ पाटील, श्री. विजयकुमार तुकाराम पवार, श्री. श्यामराव जयराम वाहुरवाघ, डॉ. गजानन जगन्नाथराव कोटेवार,यांच्या उपस्थितीत दि. २४ सप्टेंबर,२०२५ रोजी संपन्न झाली.

सदर बैठकीत प्र. ग्रंथालय संचालक, अशोक गाडेकर यांनी अध्यक्ष व उपस्थित सदस्यांचे **भारतीय संविधानाची उद्देशिका** देवून स्वागत करून प्रास्ताविक केले. मागील बैठकीतमध्ये शिफारीत केलेल्या सन २०२३ च्या ग्रंथ निवड शिफारस यादीचे प्रकाशन अध्यक्षांच्या हस्ते करण्यात आले. मागील सन २०२३ च्या बैठकीनंतर प्राप्त झालेल्या पुस्तकांची शिफारस बैठकीत करण्यात आली. या बैठकीमध्ये ग्रंथनिवडीचे निकष ठरविण्यात आले. जिल्हा ग्रंथालय अधिकारी, श्री. योगेश रा. बिर्जे यांनी सर्वांचे आभार प्रदर्शन केले आणि बैठकीच्या यशस्वीतेसाठी श्रीम. सीमा गांगण, श्री. सचिन डेव्हिड, श्री. विवेक जाधव, श्रीम.शलाका पावसकर, श्रीम. अरुणा धनू, श्री. अनिल नवाळे, श्री.विलास राणे, श्री. जियाउद्दीन शेख, श्री. कन्हैय्या कबीरा, इ. कर्मचारीवर्ग प्रयत्नशील होते.

**बैठकीत अध्यक्ष आणि सदस्यांनी सन २०२४ मध्ये प्रकाशित झालेली मराठी पुस्तके संचालनालयास पाठविण्याबाबत निवेदन वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात यावे, जेणेकरून सन २०२४ च्या ग्रंथ निवडीमध्ये चांगल्या प्रकाशकांची पुस्तके यादीत समाविष्ट होतील अशी सूचना केली. त्यानुसार निवेदन ग्रंथालय संचालनालयाच्या www.dol.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर ठेवण्यात आले आहे.**

**(अशोक मा. गाडेकर)**
प्र. ग्रंथालय संचालक